क्रमांक : १९७४५ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १४ मे, २०१५.

**प्रेषक :**

**प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति :**

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य.**

**विषय : मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्विकारण्याबाबत.**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या **सोमवार, दिनांक १३ जुलै, २०१५ रोजीपासून विधान भवन, मुंबई** येथे सुरु होणा-या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरिता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग दोन द्वारे सर्व मा.सदस्यांना **गुरुवार,दिनांक १४ मे, २०१५ रोजी वितरित करण्यात येत आहे (प्रत सोबत जोडली आहे).**

महाराष्ट्र विधानपरिषदेतील तारांकित प्रश्नांच्या बॅलटपध्दतीबाबत विचारविनिमय करण्यासाठी **दिनांक १२ मे, २०१०** रोजी मा.सभापती, विधानपरिषद यांच्या दालनात बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार विधानपरिषदेत एकच बॅलटपध्दती अवलंबिण्यात येणार आहे. त्यानुसार तारांकित प्रश्न सूचना देण्यासाठी **सोमवार, दिनांक २५ मे, २०१५** रोजी मा.सदस्य स्वतः अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहिल्यास त्या दिवशी त्यांच्याकडून मा.सभापती यांच्या आदेशानुसार **प्रत्येकी ३१ याप्रमाणे तारांकित प्रश्न सूचना, सकाळी ११.३० ते दुपारी ४.३० या वेळेत ई-१ कक्ष, कक्ष क्रमांक १३०४, तेरावा मजला, विधान भवन, मुंबई** येथे स्विकारण्यात येतील. सदर दिवशी स्विकारण्यात यावयाच्या प्रश्न सूचनांपैकी तारांकीत स्वीकृत झालेल्या प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **बुधवार, दिनांक १७ जून, २०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई** येथे घेण्यात येईल. सदरहू बॅलट प्रसंगी उपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट पाच फे-यांमध्ये (१+२+३+५+उर्वरित) घेण्यात येईल व सदर बॅलटसाठी प्रश्न सूचना दिलेल्या मा.सदस्यांपैकी अनुपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट अशाच प्रकारे पाच फेऱ्यांमध्ये तद्‌नंतर घेण्यात येईल. **सदर बॅलटकरिता अनुपस्थित राहणाऱ्या सदस्यांचे, त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींकडून किंवा अन्य सदस्यांकडून प्राधिकारपत्र (Authority Letter) न स्विकारण्याचा निर्णयही सदर बैठकीत घेण्यात आला आहे.**

**तसेच संसदीय कार्य विभागाने चार आठवडयांचा म्हणजेच दिनांक १३ जुलै, २०१५ ते दिनांक ७ ऑगस्ट, २०१५ रोजीपर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती,विधान परिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एका आठवडयाचा जादा कार्यक्रम चक्रानुक्रमात दाखविण्यात येत आहे.**

दिनांक २५ मे, २०१५ रोजी प्राप्त झालेल्या प्रश्न सूचनांवरील कार्यवाहीबाबतचा तपशील **बुधवार, दिनांक १७ जून, २०१५** रोजीपासून या सचिवालयातील ई-१ कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा. सदस्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्यात येईल.

**तसेच शुक्रवार, दिनांक १२ जून, २०१५ रोजीपासून दुसऱ्या टप्प्यातील तारांकित प्रश्न सूचना विधानपरिषद प्रश्न शाखा (१३ वा मजला, कक्ष क्रमांक १३०४) विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.०० वाजल्यापासून स्विकारण्यात येतील. सदर प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न, दिनांक १७ जून,२०१५ रोजी होणाऱ्या बॅलटच्या प्रश्नांनंतर, त्या प्रश्नांच्या अनुक्रमांकानुसार तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.**

कृपया याची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**( ज.बा.राणे )**
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,**
**विधान भवन, मुंबई-४०० ०३२.**

# महाराष्ट्र विधानपरिषद

क्रमांक : ६५

**पत्रक भाग दोन**

**गुरुवार, दिनांक १४ मे, २०१५/, वैशाख २४, १९३७ (शके)**

## महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१५ मधील द्वितीय अधिवेशनातील (माहे जुलै-ऑगस्ट, २०१५) तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम

७४ महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१५ मधील द्वितीय अधिवेशन **(माहे जुलै-ऑगस्ट, २०१५)** कालावधीकरिता माननीय मंत्र्यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय सभापतींनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आखलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल.

सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३)**

**सोमवार, दिनांक २५ मे, २०१५ रोजी स्विकारण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्विकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट बुधवार, दिनांक १७ जुन, २०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे मा. सदस्यांच्या उपस्थितीत घेण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी उपस्थित राहणा-या मा.सदस्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता मिळणार नाही. तसेच शुक्रवार, दिनांक १२ जून, २०१५ रोजी पासून स्विकारण्यात येणाऱ्या प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न बुधवार, दिनांक १७ जून, २०१५ रोजी होणाऱ्या बॅलटसाठी घेण्यात येणाऱ्या प्रश्नांनंतर अनुक्रमे तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.**

**तसेच या सचिवालयातील ई-१ कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा. सदस्यांना वा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधींना तारांकित प्रश्नांचे प्रपत्र उपलब्ध करून देण्यात येतील. प्रत्येक अधिवेशनासाठी या सचिवालयाकडून स्वतंत्रपणे छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रातच प्रश्न सूचना देण्यात याव्यात. प्रत्येक अधिवेशनासाठी छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रात प्रश्न सूचना देण्यात आल्या नसल्यास, त्या सूचना रद्द करण्यात येतील.**

# विवरणपत्र

| गट क्रमांक. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२) आदिवासी विकास मंत्री<br>(३) उद्योग मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)<br>(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री | सोमवार, दिनांक १३ जुलै, २०१५<br>सोमवार, दिनांक २० जुलै, २०१५<br>सोमवार, दिनांक २७ जुलै, २०१५<br>सोमवार,दिनांक ०३ ऑगस्ट, २०१५<br>* सोमवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१५ | शुक्रवार, दिनांक १२ जून, २०१५<br>शुक्रवार, दिनांक १९ जून, २०१५<br>शुक्रवार, दिनांक २६ जून, २०१५<br>शुक्रवार, दिनांक ०३ जुलै, २०१५<br>शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०१५ |
| दोन | (१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री<br>(३) जलसंपदा मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री | मंगळवार, दिनांक १४ जुलै, २०१५<br>मंगळवार, दिनांक २१ जुलै, २०१५<br>मंगळवार, दिनांक २८ जुलै, २०१५<br>मंगळवार, दिनांक ०४ ऑगस्ट, २०१५<br>* मंगळवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ | शुक्रवार, दिनांक १२ जून, २०१५<br>शनिवार, दिनांक २० जून, २०१५<br>शुक्रवार, दिनांक २६ जून, २०१५<br>शनिवार, दिनांक ०४ जुलै, २०१५<br>शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०१५ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री | बुधवार, दिनांक १५ जुलै, २०१५<br>बुधवार, दिनांक २२ जुलै, २०१५<br>बुधवार, दिनांक २९ जुलै, २०१५<br>बुधवार, दिनांक ०५ ऑगस्ट, २०१५<br>* बुधवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ | शुक्रवार, दिनांक १२ जून, २०१५<br>शनिवार, दिनांक २० जून, २०१५<br>शुक्रवार, दिनांक २६ जून, २०१५<br>शनिवार, दिनांक ०४ जुलै, २०१५<br>शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०१५ |
| चार | (१) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(२) परिवहन मंत्री<br>(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री | गुरुवार, दिनांक १६ जुलै, २०१५<br>गुरुवार, दिनांक २३ जुलै, २०१५<br>गुरुवार, दिनांक ३० जुलै, २०१५<br>गुरुवार, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१५<br>* गुरुवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ | सोमवार, दिनांक १५ जून, २०१५<br>सोमवार, दिनांक २२ जून, २०१५<br>सोमवार, दिनांक २९ जून, २०१५<br>सोमवार, दिनांक ०६ जुलै, २०१५<br>सोमवार, दिनांक १३ जुलै, २०१५ |
| पाच | (१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री<br>(३) पर्यावरण मंत्री<br>(४) पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्री | शुक्रवार, दिनांक १७ जुलै, २०१५<br>शुक्रवार, दिनांक २४ जुलै, २०१५<br>शुक्रवार, दिनांक ३१ जुलै, २०१५<br>शुक्रवार, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१५<br>*शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०१५ | मंगळवार, दिनांक १६ जून, २०१५<br>मंगळवार, दिनांक २३ जून, २०१५<br>मंगळवार, दिनांक ३० जून, २०१५<br>मंगळवार, दिनांक ०७ जुलै, २०१५<br>मंगळवार, दिनांक १४ जुलै, २०१५ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार दिनांक १३ जुलै, २०१५ ते शुक्रवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवडयाच्या प्रश्नसूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १४ मे, २०१५.

डॉ.अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा. सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

**(१) श्री. देवेंद्र फडणवीस ---- मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग,
(२) नगरविकास विभाग,
(३) गृह विभाग,
(४) विधी व न्याय विभाग,
(५) बंदरे विभाग,
(६) पर्यटन विभाग,
(७) माजी सैनिकांचे कल्याण विभाग,
(८) रोजगार व स्वयंरोजगार विभाग व इतर मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग व त्यांचे भाग

**(२) श्री. एकनाथराव गणपतराव खडसे --- महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूंकप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

(१) महसूल व वन विभाग (महसूल विषयक आणि पुनर्वसन व मदत कार्य आणि भूंकप पुनर्वसन विषयक बाबी)
(२) अल्पसंख्याक विकास विभाग (अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विषयक बाबी)
(३) कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(४) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

**(३) श्री. सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार --- वित्त आणि नियोजन, वने मंत्री**

(१) वित्त विभाग
(२) नियोजन विभाग
(३) महसूल व वन विभाग (वने विषयक बाबी)

**(४) श्री. विनोद श्रीधर तावडे --- शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री**

(१) शालेय शिक्षण, क्रीडा विभाग
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)
(४) मराठी भाषा विभाग
(५) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)

**(५) श्री. प्रकाश मंचूभाई मेहता --- गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री**

(१) गृहनिर्माण विभाग
(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार आणि खनिकर्म विषयक बाबी)

**(६) श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील --- सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**

(१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभाग
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

**(७) श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे--- ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**

(१) ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग
(२) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(३) महिला आणि बालकल्याण विभाग

**(८) श्री. विष्णु रामा सावरा --- आदिवासी विकास मंत्री**

आदिवासी विकास विभाग

**(९) श्री. गिरीश भालचंद्र बापट--- अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**

(१) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग
(२) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग (अन्न आणि औषध प्रशासन विषयक बाबी)
(३) संसदीय कार्य विभाग

**(१०) श्री. गिरीष दत्तात्रय महाजन---- जलसंपदा मंत्री**

जलसंपदा विभाग

**(११) श्री. दिवाकर नारायण रावते --- परिवहन मंत्री**

गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)

**(१२) श्री. सुभाष राजाराम देसाई --- उद्योग मंत्री**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग विषयक बाबी)

**(१३) श्री. रामदास गंगाराम कदम -- पर्यावरण मंत्री**

पर्यावरण विभाग

**(१४) श्री. एकनाथ संभाजी शिंदे --- सार्वजनिक बांधकाम मंत्री**

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम विषय व बाबी)

**(१५) श्री. चंद्रशेखर कृष्णराव बावनकुळे --- ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी)

**(१६) श्री. बबनराव दत्ताराव लोणीकर --- पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री**

पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

**(१७) डॉ. दीपक रामचंद्र सावंत --- सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री**

सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण विभाग

**(१८) श्री. राजकुमार सुदाम बडोले --- सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग